**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

**तेलंगाणा राज्यात श्री संत गाडगे बाबांचा सन्मान**
**महाराष्ट्राचे माजी राज्यपाल चे. विद्यासागर राव लिखीत पुस्तक व सी.डी. चे प्रकाशन**
**संत गाडगे बाबांच्या पुतळ्याचे अनावरण**
**कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांना विशेष आमंत्रण व उपस्थिती**

अमरावती-

महाराष्ट्राचे माजी राज्यपाल तथा संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे माजी कुलपती श्री चे. विद्यासागर राव यांनी कर्मयोगी संत गाडगे बाबांचे विचार केवळ महाराष्ट्रापुरतेच मर्यादित न राहता, ते तेलंगणा राज्यात पोहोचविले. संत गाडगे बाबांचे विचार व कार्यानुसार त्यांनी प्रेरणा घेतली व गाडगे बाबांचे विचार देशभरात पोहोचले पाहिजे, या उद्देशाने हैद्राबाद याठिकाणी त्यांनी गाडगे बाबांचा पुतळा तयार केला. त्याचे अनावरण नुकतेच हैद्राबाद याठिकाणी संपन्न झाले.

गाडगे बाबांच्या विचाराने माजी राज्यपाल इतके प्रभावित झाले की, त्यांनी संत गाडगे बाबांवर पुस्तक सुद्धा लिहिले. याशिवाय गाडगे बाबांचे कार्य तळागळातील सर्वांपर्यंत पोहोचावे, यासाठी चित्रफित तयार केली. पुस्तक व चित्रफितीचे कार्यक्रमाप्रसंगी प्रकाशन करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून महाराष्ट्राचे माजी राज्यपाल श्री चे. विद्यासागर राव आणि विशेष म्हणजे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांना उपस्थित राहण्याकरीता विशेष निमंत्रित म्हणून बोलाविण्यात आले होते. यानिमित्ताने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाला बहुमान मिळाला. याप्रसंगी चिलकुरु बालाजी मंदिराचे श्री सी.एस. रंगराजन, अखिल भारत सामाजिक समरसता वेदिकाचे संयोजक श्री के. शामाप्रसाद, श्री बी. दक्षिणा मूर्ती, एन.एस.सी.आर.पी.एस. चे अध्यक्ष श्री कर्णे श्रीसैलम, विमुक्त संचार जतुला अभिवृद्धी मंडालीचे अध्यक्ष श्री पी. स्वर्णकुमार व सामाजिक समरसता वेदिकाचे अध्यक्ष डॉ. वम्षा टिळक अध्यक्षस्थानी उपस्थित होते.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठामध्ये प्रवेशद्वाराच्या दर्शनी भागावर कर्मयोगी संत गाडगे बाबांचे संदेशशिल्प उभारण्यात आले आहे. या संदेशशिल्पाचे अनावरण तत्कालीन महाराष्ट्राचे राज्यपाल तथा तत्कालीन विद्यापीठाचे कुलपती यांचे शुभहस्ते करण्यात आले होते. यावेळी कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी त्यांना विद्यापीठातील संत गाडगे बाबा अध्यासनामध्ये संत गाडगे बाबांच्या जीवन कार्यावर असलेली चित्रफित दाखविली होती. गाडगे बाबांच्या जीवनापासून व कार्यापासून श्री राव यांना प्रेरणा मिळाली. सामाजिक विकासासाठी शिक्षण हे महत्वाचे साधन आहे आणि सर्वांना शिक्षण मिळालेच पाहिजे, त्याकरीता आपल्या मुलाबाळांना शिकवा, ही आत्यंतिक तळमळीची शिकवण गाडगे बाबांनी समाजाला दिली. एवढ्या मोठ्या संताचे कार्य समाजातील तळागळातील व्यक्तींपर्यंत पोहोचले पाहिजे, अशी इच्छा त्यावेळी चे. विद्यासागर राव यांनी व्यक्त केली होती, आणि गाडगे बाबांचे कार्य सर्वांना प्रेरणादायी रहावे, यासाठी पुण्यतिथीदिनी हैद्राबाद येथे गाडगे बाबांचा पुतळा अनावरण कार्यक्रम त्यांनी घेतला. एवढेच नव्हे, तर त्यांच्या कार्याचा प्रसार तेलंगणा राज्यात व्हावा, यासाठी जनतेपर्यंत पुस्तक रुपाने त्यांचे विचार सुद्धा पोहोचविण्याचे महान कार्य त्यांनी केले आहे. याप्रसंगी श्री चे. विद्यासागर राव यांनी गाडगे बाबांच्या विचारकार्यावर आपल्या भाषणातून माहिती दिली. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कार्य गाडगे बाबांच्या विचारकार्यानुसार सुरु असल्याचे सांगून विद्यापीठाच्या कार्याचे त्यांनी कौतुक केले.

कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी सर्वप्रथम माजी राज्यपाल तथा माजी कुलपती चे. विद्यासागर राव यांनी गाडगे बाबांचे कार्य तेलंगणा राज्यात पोहोचविल्याबद्दल विद्यापीठाच्यावतीने आभार व्यक्त केले. गाडगे बाबांची दशसूत्री विज्ञाननिष्ठ असून प्रत्येकाने आपल्या जीवनामध्ये ती अंगिकारावी, असे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले. याप्रसंगी उपस्थित मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. १५/०१/२०२१.

दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी

[C:\Users\PRO\Desktop\OM\UNIVERSITY NEWS 2021.pmd] 14